**"महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" योजनेअंतर्गत जळगाव महानगरपालिकेस निधी वितरीत करण्याबाबत.**

**सन २०२३-२४ साठी लेखाशिर्ष (२२१७ ९४८३) खाली रक्कम रू.५.०० कोटी.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-मनह-२०२३/प्र.क्र.३१६(२)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक:- ०६ जुलै, २०२३.**

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-२०१२/ प्र.क्र.२४/ नवि-१६, दिनांक २७ जून, २०१२, व दिनांक २४ जानेवारी, २०२२.

(२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२ एप्रिल,२०२३.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्रमांक (२) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास कामांकरीता "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" योजनेंतर्गत जळगाव महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील या सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांस **रक्कम रु.५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी मात्र)** इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **"सार्वजनिक बांधकाम विभाग"** राहील.

४. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किमतीची (रू. १०.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) एकत्रित करून शासनाकडून एकत्रित प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई- निविदा पद्धतीनेच करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

**६.** सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम रु.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. <u>जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित

केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे."ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. <u>कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

**१०.** यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन,संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

**११.** सदर निधी दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करिता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, **जळगाव** यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, **जळगाव** यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, **जळगाव**/ जिल्हा प्रशासन अधिकारी**, जळगाव** यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस तात्काळ वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये **"महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य"** या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१५. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१६. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबितअसल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१७. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१८. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी इतरत्र थेट वळता करू नये.

१९. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१व दि.२८ मार्च,२०२२, दि.४ एप्रिल, २०२२ व २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

**२१.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (६४) हद्दवाढ झालेल्या महानगरपालिकांना नव्याने समाविष्ट क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य, (२२१७ ९४८३), ३१, सहायक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**२२.** सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल,२०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या

अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

०६/०७/२३

**(श्रीकांत चं.आंडगे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. विभागीय आयुक्त, **जळगाव**
४. जिल्हाधिकारी, **जळगाव**
५. आयुक्त, **जळगाव** महानगरपालिका
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव
१२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव

१३. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव

१४. जिल्हा प्रशासन अधिकारी, जळगाव

१५. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

१६. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७. निवड नस्ती (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

# शासन निर्णय क्रमांक- मनह-२०२३/प्र.क्र.३१६(२)/नवि-१६, दिनांक ०६ जुलै, २०२३ सोबतचे विवरणपत्र

## जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील कामे

| अ.क्र | कामांची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.०१ व ०२ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| २. | प्रभाग क्र.०३ व ०४ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| ३. | प्रभाग क्र.०८ व ०९ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| ४. | प्रभाग क्र.१० व ११ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| ५. | प्रभाग क्र.१२ व १३ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| ६. | प्रभाग क्र.१४ व १७ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १५.०० |
| ७. | प्रभाग क्र.१९ अंतर्गत ठिकठिकाणी पथदिवे बसविणे. | १०.०० |
| ८. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. बडगुजर ते श्री. वामनराव पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ९. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. चौधरी ते श्री. पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १०. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. मुकुंदा कुलकर्णी ते श्री. ठाकरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ११. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. वाणी ते श्री. कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १२. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. उमेश चव्हाण यांच्या घरापासून ते पिंप्राळा बजार रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १३. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री कष्ट्भंजन हनुमान मंदिराशेजारील रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १४. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. पाटील ते श्री. महेश कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १५. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. दाभाडे ते श्री. झोपे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १६. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. चौधरी ते श्री. नाईक यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १७. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री. नरेंद्र नाईक ते पिंप्राळा रथ मार्ग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १८. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील अमृत प्ले स्कूल ते श्री. एच. बी. पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |

06/07/23

| अ.क्र | कामांची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १९. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री.वीरप्पन ते श्री. प्रेमल बंगलो पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २०. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील IDBI एटीएम ते श्री. पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २१. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री. गीते ते श्री. गजानन पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २२. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री.सावंत ते श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २३. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २४. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत चंदूअण्णा नगर येथील गट नं.२६, हनुमान मंदिराजवळील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| २५. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत गट नं.८, सर्वे नं.२९०अ/२ब/३ येथील आधार जेष्ठ नागरिक संघ जवळील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | ३०.०० |
| २६. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत गट नं.९० येथील साईबाबा मंदिराजवळील ओपन स्पेस मध्ये ओपन जिम साहित्य पुरविणे. | १०.०० |
| २७. | प्रभाग क्र.१० अंतर्गत गट नं.३५०, पिंप्राळा गावठाण, कुंभार वाडा येथे सभागृह बांधणे. | २०.०० |
| २८. | प्रभाग क्र.१० अंतर्गत पिंप्राळा स्मशानभूमी सुशोभिकरण करणे. | ३०.०० |
| २९. | प्रभाग क्र.१९ अंतर्गत गट नं.१६८/२अ, सुप्रीम कॉलनी येथील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| ३०. | प्रभाग क्र.१९ अंतर्गत गट नं.१६६/१+४, सुप्रीम कॉलनी येथील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| ३१. | प्रभाग क्र.०१ व ०२ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३२. | प्रभाग क्र.०३ व ०४ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३३. | प्रभाग क्र.०८ व ०९ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३४. | प्रभाग क्र.१० व ११ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३५. | प्रभाग क्र.१२ व १३ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३६. | प्रभाग क्र.१४ व १७ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |
| ३७. | प्रभाग क्र.१९ व ०३ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. | १०.०० |

06/07/23

| अ.क्र | कामांची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ३८. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत लिलापर्क येथे श्री. किसन मराठे यांच्या घरापासून ते श्री. अटाळे यांच्या घरापर्यंत रस्ता व आर. सी. सी. गटार बांधणे. | १०.०० |
| ३९. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत लिलापर्क येथे गट नं.१३६, श्री. शिंदे साहेब यांच्या घरापासून ते श्री. ललित चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता व आर. सी. सी. गटार बांधणे. | १०.०० |
| ४०. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत लिलापर्क मधील रस्ते व आर. सी. सी. गटार बांधणे. | १०.०० |
| ४१. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत ऑफिसर्स क्लब सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| ४२. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत गट नं.६५/३, बहिणाबाई नगर येथील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु.( लक्ष)** | **५००.००** |

06/07/23